# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## मुक्त अध्ययन प्रशाळा

## शैक्षणिक वर्ष २०२०-२१ : अभ्यासकेंद्रावर प्रवेश अर्ज जमा करणेबाबत

### १) प्रथम वर्ष बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम.

प्रथम वर्ष बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम. या वर्गात प्रवेश घेण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज त्यांनी निवडलेल्या अभ्यास केंद्रावर जमा करणे आवश्यक आहे. तथापि, कोविड-१९ महामारीच्या पार्श्वभूमीवर असलेल्या लॉकडाऊनमुळे सद्य स्थितीत विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज जमा करण्यासाठी आपल्या अभ्यास केंद्रावर जाऊ नये किंवा अभ्यास केंद्रावर प्रवेश अर्ज टपालाने पाठवू नयेत तसेच प्रवेश अर्ज **विद्यापीठामध्ये जमा करू नयेत.**

अभ्यास केंद्रावर प्रवेश अर्ज जमा करण्यासाठीची सूचना मुक्त अध्ययन प्रशाळेच्या http://unipune.ac.in/sol/admission.html या संकेतस्थळावर प्रदर्शित केली जाईल आणि त्यानुसार प्रवेश अर्ज अभ्यास केंद्रावर जमा करणे विद्यार्थ्यांसाठी बंधनकारक राहील.

### २) द्वितीय वर्ष बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम. (प्रशाळेच्या जुन्या विद्यार्थ्यांसाठी)

ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये मुक्त अध्ययन प्रशाळेअंतर्गत प्रथम वर्षास प्रवेश घेतला होता आणि शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये द्वितीय वर्ष बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम. या वर्गात प्रवेश घेण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज केलेला आहे अशा विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज त्यांच्या अभ्यास केंद्रावर जमा करू नयेत.

### ३) द्वितीय वर्ष बी.ए., बी.कॉम., (थेट प्रवेश घेणाऱ्या' विद्यार्थ्यांसाठी)

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये महाविद्यालयातून प्रथम वर्ष पूर्ण करून शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये मुक्त अध्ययन प्रशाळेत थेट द्वितीय वर्ष बी.ए., बी.कॉम. या वर्गात प्रवेश घेण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज त्यांनी निवडलेल्या अभ्यास केंद्रावर जमा करणे आवश्यक आहे. तथापि, कोविड-१९ महामारीच्या पार्श्वभूमीवर असलेल्या लॉकडाऊनमुळे सद्य स्थितीत विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज जमा करण्यासाठी आपल्या अभ्यास केंद्रावर जाऊ नये किंवा अभ्यास केंद्रावर प्रवेश अर्ज टपालाने पाठवू नयेत तसेच प्रवेश अर्ज **विद्यापीठामध्ये जमा करू नयेत.**

अभ्यास केंद्रावर प्रवेश अर्ज जमा करण्यासाठीची सूचना मुक्त अध्ययन प्रशाळेच्या http://unipune.ac.in/sol/admission.html या संकेतस्थळावर प्रदर्शित केली जाईल आणि त्यानुसार प्रवेश अर्ज अभ्यास केंद्रावर जमा करणे विद्यार्थ्यांसाठी बंधनकारक राहील.